


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : ०८५ • पुणे • रविवार, दि. ०७ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# निकाल २१ डिसेंबरलाच

## नगरपरिषद, नगरपंचायत मतमोजणीचा नागपूर उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाकडून कायम



**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल 21 डिसेंबर रोजी लागणार आहे. नागपूर उच्च न्यायालयाच्या आदेशावर आज सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. सोबतच विरोधातली याचिकाही फेटाळून लावली. त्यामुळे मतदारांचे लक्ष आता आगामी मतमोजणीकडे लागले असून अनेक शहरांतील सत्तांतराविषयीची उत्सुकता वाढली आहे.

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतदान प्रक्रिया सुरू असतानाच नागपूर खंडपीठाने मतमोजणी पुढे ढकलण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे आज या प्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

राज्यातील 264 नगरपालिका व नगरपंचायतींसाठी 2 डिसेंबर रोजी मतदान पार पडले होते आणि 3 डिसेंबरला मतमोजणी होणार होती.

### न्यायालयातही दिले आव्हान

**नागपूर खंडपीठाच्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. कारंजा येथील एआयएमआयएमचे प्रदेश उपाध्यक्ष मो. युसूफ पुंजानी आणि राजकिरण बर्वे यांनी संयुक्तपणे ही याचिका दाखल केली होती. त्यांच्या वतीने ॲड. फिरोज शेकूवाले यांनी न्यायालयात मतमोजणी लांबवणे योग्य नाही आणि मतदान पूर्ण झालेल्या ठिकाणी तत्काळ निकाल जाहीर करावा अशी बाजू मांडली होती.**

### निकालाकडे सर्वांचे लक्ष

**मात्र, अंतिम निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात सर्व नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी 21 डिसेंबरलाच होणार आहेत. या निर्णयामुळे आता कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा प्रभाव निवडणुकीवर पडणार नाही, अशी भूमिका न्यायालयाने घेतली. त्यामुळे आता कोणते पक्ष स्थानिक सत्तेत परत येतील? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

मात्र, निवडणूक कार्यक्रमात केलेल्या बदलामुळे परिस्थिती बदलली.

आता उर्वरित 24 नगरपालिका व नगरपंचायतींमध्ये आणि 76 नगरपालिका व नगरपंचायतींतील 154 सदस्यपदांसाठी 20 डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याने, सर्वच निवडणुकांची मतमोजणी एकाच दिवशी होईल.

काही उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात अपील केले होते. निवडणूक नियमावलीतील तरतूद 17 (1-ब) नुसार, जेव्हा एखादा उमेदवार न्यायालयात जातो आणि निकाल येतो, तेव्हा त्या उमेदवाराला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी किंवा चिन्ह वाटपासाठी ठराविक वैधानिक वेळ देणे कायद्याने बंधनकारक असते. सद्यःस्थितीत न्यायालयाचे निकाल उशिरा आले. जर आम्ही निवडणुका तशाच घेतल्या असत्या, तर संबंधित उमेदवारांवर अन्याय झाला असता. या कारणास्तव भविष्यात संपूर्ण निवडणूकच न्यायालयात अवैध ठरली असती आणि ती रद्द करावी लागली असती. अशी नामुष्की टाळण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या निर्विघ्न पार पाडण्यासाठीच, सर्व बाजूंचा विचार करून मतदान तारखा पुढे ढकलल्या.

आधी मतदान झालेल्या ठिकाणांची मतमोजणी आधी झाली, तर उर्वरित ठिकाणच्या मतदानावर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका एका याचिकेमध्ये मांडली गेली होती. या युक्तिवादावर विचार करून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर करण्याचा आदेश दिला होता. त्यामुळे मतमोजणी 21 डिसेंबर रोजी होणार होती.

निवडणुका आणि निकाल पुढे ढकल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका केली होती. फडणवीस यांनी निवडणूक आयोगाने घेतलेले कायदेशीर निर्णय चुकीच्या अर्थाने घेतल्याचे म्हटले. तसेच आयोगाचे वकील कोण आहेत, हे माहिती नसले तरी त्यांनी कायद्याचा चुकीचा अर्थ लावला, अशीही टीका केली होती.

फक्त 284 पैकी 24 ठिकाणी मतदान बाकी आहे. त्यामुळे सर्व निकाल पुढे ढकलणे तत्त्वानुसार योग्य नसल्याचे म्हटले होते. या वक्तव्यांमुळे निवडणूक आयोगावर मोठा दबाव निर्माण झाला. तरीही आयोगाचा प्रतिसाद ठाम राहिला. आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट मत मांडले की, 'राजकीय नेत्यांना काय वाटते यापेक्षा कायदा काय सांगतो हे महत्त्वाचे असून आयोग कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेत आहे आणि पुढेही घेत राहील.'





## ठळक बातम्या



### पुणे परिसरात थंडीचा जोर ओसरला

**पुणे (आरंभ पर्व) : बांगलादेशच्या पूर्व भागात आणि आसपासच्या भागांत तसेच दक्षिण केरळच्या किनारपट्टी परिसरात चक्रीय वाऱ्यांची प्रणाली कायम आहे. या प्रभावामुळे किमान तापमानात वाढ झाली असून, शहरातील थंडी ओसरली आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस किमान तापमान स्थिर राहणार असून, त्यानंतर मात्र त्यामध्ये घट होणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. पुणे आणि परिसरात किमान आणि कमाल तापमानात चढ-उतार कायम आहे. शनिवारी (ता. ६) किमान तापमानात दोन अंश सेल्सिअसने वाढ झाली असून, १४.१ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले; तर कमाल तापमान स्थिर आहे. पुढील दोन दिवस किमान आणि कमाल तापमान स्थिर राहणार असून, त्यानंतर मात्र पुन्हा किंचित घट होणार असल्याचे हवामानशास्त्र विभागाने सांगितले. पुणे आणि परिसरात रविवारी (ता. ७) किमान तापमान स्थिर राहणार असून, १४ अंश सेल्सिअस इतके, तर कमाल तापमान २९ अंश सेल्सिअसपर्यंत नोंदविण्यात येणार आहे.**







# आमदार भीमराव तापकीर यांचा महा-मेट्रोसोबत पाहणी दौरा

## खडकवासला मेट्रो प्रकल्पाला वेग;

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील प्रस्तावित मेट्रो मार्गांचा आढावा घेण्यासाठी आमदार भीमराव तापकीर यांनी महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डीकर यांच्या सोबत प्रत्यक्ष पाहणी केली.

खडकवासला – दळवीवाडी – नांदेड सिटी – धायरी फाटा – माणिकबाग – सनसिटी – वारजे – कर्वेनगर तसेच कोथरूड – चांदणी चौक या मार्गांवरील प्रस्तावित स्टेशन स्थळांचा सखोल अभ्यास करण्यात आला. वाढती वाहतूक कोंडी, प्रवासी संख्या आणि परिसरातील वाढता शहरी विकास लक्षात घेऊन स्टेशन निवडीवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली.




नुकत्याच या प्रकल्पासाठी मोठ्या निधीची मंजुरी मिळाल्याने कामाला आता अधिक गती मिळणार आहे. लवकरच भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार असून प्रत्यक्ष मेट्रो कामाचीही लवकर सुरुवात होईल. या निर्णयामुळे खडकवासला परिसरातील वाहतूक व्यवस्थेत मोठी सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी शहर भाजपा उपाध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, रुपेश घुले पाटील, गणेश वरपे, माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, हरिदास चरवड, दिलीप वेडे पाटील, किरण बारटक्के,माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, संतोष मते तसेच युवा मोर्चा खडकवासला अध्यक्ष विशाल उभे, सारंग नवले, सागर भूमकर, अतुल चाकणकर , ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

माजी नगरसेविका ज्योती गोसावी, वृषाली चौधरी, मंजुषा नागपूरे,निताताई दांगट, राजश्री नवले,अश्विनी पोकळे, महिला आघाडी अध्यक्ष मनीषा मोरे, रश्मी घुले पाटील ,जयश्री भूमकर, कोमल कुटे यांच्यासह विविध महिला पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार तापकीर म्हणाले की,"मेट्रो हा खडकवासल्याच्या भविष्यातील वाहतुकीचा कणा ठरेल. नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक वाहतूक सुविधा मिळाव्यात यासाठी प्रकल्पाला गती देणे अत्यंत आवश्यक आहे. मिळालेल्या निधीमुळे संपूर्ण कामाचा वेग वाढेल." या पाहणी दौऱ्यामुळे खडकवासला मतदारसंघातील मेट्रो प्रकल्पाला नवी दिशा आणि गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## रवींद्र कृष्णचंद्र ठाकूर यांना पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गड्दुर्ग संवर्धन समितीतर्फे दरवर्षी समाजसेवा, शिक्षण, क्रीडा यांसह विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येते. त्याच परंपरेनुसार, यंदा समितीने आपला मानाचा "श्री स्वामी विवेकानंद राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार" हा सन्मान श्री रवींद्र कृष्णचंद्र ठाकूर यांना प्रदान केला. या भव्य सोहळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यात भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते श्री मुरलीकांत पेटकर, वरिष्ठ भारतीय लष्करी अधिकारी कर्नल श्रीकांत पुरोहित,



समितीचे अध्यक्ष व तानाजी मालुसरे यांचे वंशज कुणाल दादा मालुसरे, माजी सैनिक संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री दीपकराजे शिर्के, तसेच विविध क्षेत्रातील अधिकारी, महिला व युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

## प्रभाग ३४ मध्ये “सर्वांसाठी विशेष, एकमेव निलेश”

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 34 मध्ये संकल्प प्रतिष्ठानचे अध्यक्ष व युवासेना पदाधिकारी निलेश गिरमे यांच्या लोककल्याणकारी उपक्रमांची जोरदार चर्चा सुरू आहे. “सर्वांसाठी विशेष, एकमेव निलेश” अशी ख्याती त्यांना नागरिकांनी स्वतः दिली असून, त्यामागे त्यांचे सातत्याने केलेले सामाजिक उपक्रम, सर्वसामान्यांशी असणारा जवळचा संवाद आणि मदतीसाठी सदैव तत्पर राहण्याची वृत्ती कारणीभूत आहे.

गिरमे यांनी सुरू केलेल्या मोफत भाजीवाटप उपक्रमाचे 20वे सत्र नुकतेच गोकुळनगर–नऱ्हे येथे उत्साहात पार पडले. शिवपर्वती मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात



ताज्या भाज्यांचे वितरण करण्यात आले. कापडी पिशव्यांसह आलेल्या नागरिकांनी मोठ्या रांगांमध्ये उभे राहून भाजी घेतली, आणि उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. वाढत्या महागाईच्या काळात दिलासा देणारा हा उपक्रम हजारो नागरिकांसाठी आधारवड ठरला.

यावेळी निलेश गिरमे, उपाध्यक्ष राधिकाताई गिरमे तसेच संकल्प प्रतिष्ठानचे कार्यकर्ते—विजय कणसे ,राम तोडकरी, मनोज चव्हाण, प्रशांत जाधव, चेतन कौंद्रे, विनोद राठोड, अदित्य बैकर, भूषण वाघमारे, गणेश राठोड, सौरभ जगताप आणि लोकेश राठोड—यांनी परिश्रम घेत भाजीवाटपाची जबाबदारी सांभाळली.

गिरमे म्हणाले, “हा उपक्रम फक्त आजपुरता नाही. प्रत्येक महिन्याच्या रविवारी प्रभागातील विविध भागांत भाजीवाटप आयोजित करण्यात येईल. शेतकऱ्यांचा सन्मान आणि जनतेची मदत हेच आमचे ध्येय आहे.”

हा उपक्रम पाहून नागरिकांनी गिरमे यांच्या सेवाभावाचे कौतुक केले.“जनतेसाठी नेहमी पुढे असणारा, सर्वांचा निलेश गिरमे” अशी प्रशंसा प्रभागात सर्वत्र ऐकू येत आहे. माणुसकी आणि सेवा हेच राजकारणाचे खरे तत्त्व असल्याचे गिरमे यांनी पुन्हा एकदा आपल्या कामातून दाखवून दिले आहे.

## खानापूर : माजी विद्यार्थ्यांकडून भरघोस आर्थिक सहाय्य

**(दै. आरंभ पर्व)**
**खानापुर - विशाल भालेराव**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून विद्यालयाला भरघोस आर्थिक सहाय्य दिले. रघुनाथ यादव, नंदकुमार कारळे, पांडुरंग कारळे, विजय कारळे आणि बाबासाहेब शिंदे यांनी शाळेतील गरजवंत व गुणी विद्यार्थ्यांसाठी विविध मदत उपलब्ध करून दिली. मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून उपक्रमाची सुरुवात झाली.

स्काऊट व गाईड विभागातील विद्यार्थ्यांसाठी शाळेचे प्रथम विद्यार्थी रघुनाथ यादव यांनी ₹२०,००० चे सहाय्य केले. पांडुरंग कारळे, नंदकुमार कारळे आणि विजय कारळे यांनी मिळून ₹१५,००० ची मदत गरजवंत व हुशार विद्यार्थ्यांसाठी जाहीर केली. तर बाबासाहेब शिंदे यांनी ₹५,००० चे शैक्षणिक शुल्क वाटप केले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष रघुनाथ यादव म्हणाले,“स्काऊट व गाईडच्या माध्यमातून सुजाण, शिस्तप्रिय नागरिक घडावेत. आम्ही या शाळेचे विद्यार्थी आहोत याचा आम्हाला अभिमान आहे.” सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत जाधव यांनी शैक्षणिक साहित्य व शुल्कासाठी विद्यार्थ्यांना सहाय्य मिळवून देण्याचे प्रयत्न केले.“विद्यार्थ्यांसाठी मदत उपलब्ध करून देण्यात आम्ही यशस्वी झालो, ही समाधानाची बाब आहे,” असे ते म्हणाले.

प्रास्ताविक प्राचार्य शिवराम साबळे यांनी केले.“माजी विद्यार्थी सतत शाळेच्या गौरवात भर घालत असतात,” असे त्यांनी मनोगतात सांगितले आणि सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमात प्राचार्य शिवराम साबळे, रघुनाथ यादव, नंदकुमार कारळे, बाबासाहेब शिंदे आणि माजी शिक्षक शशिकांत जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन भगवान मदने यांनी केले, तर आभार नूतन ओतुरकर यांनी मानले. फलकलेखन अपर्णा आढाव यांनी केले आणि कार्यक्रमाचे नियोजन नूतन ओतुरकर, शितल वरपे तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सहकाऱ्यांनी केले.



## दत्त जयंतीनिमित्त कुटे परिवाराच्या घरी मान्यवरांची सदिच्छा भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दत्त जयंतीच्या औचित्यावर पुणे शहराचे डीसीपी माननीय श्री. संभाजी कदम साहेब यांनी कुटे परिवाराच्या घरी येऊन सदिच्छा भेट देत कार्यक्रमाला विशेष मंगलमय उपस्थिती दर्शविली. यावेळी युवा उद्योजक श्री. मनोजदादा कुटे, युवा नेते श्री. स्वप्नीलभाऊ कुटे तसेच कुटे परिवारातील सदस्यांनी आदरातिथ्याने स्वागत केले. दत्त जयंतीनिमित्त आयोजित या सदिच्छा भेटीत सर्व क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनीही उपस्थिती लावली. समाजकार्य, राजकारण, उद्योग, शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली. तसेच आमदार, आजी-माजी नगरसेवक आणि पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी वर्गानेही कार्यक्रमाला हजेरी लावत कुटे परिवाराला शुभेच्छा दिल्या. सर्व मान्यवरांच्या भेटीमुळे कुटे परिवाराचा दत्त जयंती उत्सव अधिक उजळून निघाला.

## प्रभाग क्रमांक ३४ मधील नागरिकांच्या अपेक्षा

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

मी प्रभाग 34 मधील, नऱ्हेगावातील एक सामान्य नागरिक आहे. मला माझ्या लोकप्रतिनिधींकडून या अपेक्षा आहेत. नवीन लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी म्हणून मी काही समस्या मांडत आहे. सर्वप्रथम माझा कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही. आमच्या नऱ्हेगावाचा महानगरपालिकेमध्ये समावेश झाल्यानंतर पहिल्यांदाच महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. आमच्या नऱ्हेगावातील समस्या या सर्वांनाच माहित आहे.

यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे, पाण्याची समस्या आहे... टँकरच्या पाण्यासाठी आम्ही हजारो लाखो रुपये मोजत आहोत. टँकरचे



**राजेश नानासाहेब बोबडे**
एक सर्वसामान्य नागरिक
प्रभाग क्रमांक ३४
9689904150

पाणी जेथून भरले जाते तिथून शुद्ध पाणी मिळेल याची खात्री नाही तरीही ना इलाज असतो आम्हाला टँकरचे पाणी घ्यावे लागते. गावातील वाढत जाणारी लोकसंख्या पाहता गटार पाणी वाहून नेण्यासाठी ड्रेनेज पाईपलाईन व्यवस्था सक्षम करावी लागणार आहे. खड्डे विरहित रस्ते हा सुद्धा आमचा हक्क आहे, पण आज नरेगावातील जवळपास सर्वच रस्त्यांवर खड्डे आहेत.

गावात वाढलेली गुन्हेगारी हा सुद्धा चिंतेचा विषय आहे. भयमुक्त वातावरण हा सुद्धा आम्हा सामान्य नागरिकांचा अधिकार आहे. अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग ही तर आमच्या गावातील मोठी समस्या आहे. महामार्गावरील नरेगावात होणारा प्रवेश बंद केल्यामुळे आता वाहतूक कोंडी होत नसली तरी अतिक्रमणे, अनधिकृत पार्किंग आणि रस्ता अडवून व्यवसाय करणारे आत्ताच हटवली तर पुढची काही वर्षे गावातील रस्ते मोकळा श्वास घेतील.

कचरा व्यवस्थापन हा सुद्धा गावातील चिंतेचा विषय आहे. महानगरपालिकेची स्वच्छ ही संस्था कचरा घेऊन जाते पण त्यासाठी आम्हाला भरपूर पैसे मोजावे लागतात. तसेच काही भागात ही संस्था अजून पोहोचलेली नाही.

नवले पुलाच्या सुरुवातीला साताऱ्याकडे जाताना आणि वडगाव पुलाच्या सुरुवातीला मुंबईकडे जाताना अवैध वाहतूक करणारे रस्ता अडवून असतात त्यांचाही बंदोबस्त करावा. आमच्या गावातील जिल्हा परिषदेची शाळा आता महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाली आहे. या शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी गुणवान असून शाळेला आणखीन चांगले करण्याची गरज आहे. गावात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र किंवा उद्यान बनवावे जेणेकरून तेथे लहान मुलेही खेळायला जातील. तसेच क्रीडांगणाचीही गरज आहे.

नऱ्हेगावातून हिंजवडी, बाणेर, पिंपरी चिंचवड, हडपसर, आणि पुणे शहराचा मध्यवर्ती भाग यासाठी बस सेवा उपलब्ध करून द्यावी. (सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी ही संपूर्ण पुणे महानगरपालिकेकडून आमची अपेक्षा आहे) गावात महानगरपालिकेचे एक रुग्णालय असावे. पादचाऱ्यांसाठी पदपथ, रस्त्यावरचे दिवे चालू असावेत. एवढ्या काही अपेक्षा आम्हाला आमच्या नगरसेवकांकडून आहेत. या पूर्ण व्हाव्यात हीच विनंती आहे.

## मॅजिक चित्रपटाचा रंजक टीजर लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात गौरवला गेलेला "मॅजिक" हा चित्रपट १ जानेवारी रोजी प्रदर्शित होत आहे. एन्काऊंटर स्पेशलिस्ट असलेल्या पोलिस अधिकाऱ्याच्या आयुष्यात घडणाऱ्या उलथापालथींची एक रंजक गोष्ट "मॅजिक" चित्रपटात दाखविण्यात आली आहे. नुकताच या चित्रपटाचा टीजर मराठी सिनेसृष्टीचे महानायक पद्मश्री अशोक सराफ आणि सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता जोशी सराफ यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आला. तुतरी व्हेंचर्स या निर्मिती संस्थेच्या राजू सत्यम यांनी याआधी बॉलीवूड, तमिळ चित्रपटांची निर्मिती केली असून "मॅजिक" या चित्रपटाद्वारे त्यांनी मराठी सिनेसृष्टीत निर्माता म्हणून पाऊल टाकले आहे. रवींद्र विजया करमरकर यांनी या




चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. योगेश विनायक जोशी, रवींद्र विजया करमरकर यांनी कथालेखन, तर योगेश विनायक जोशी, अभिषेक देशमुख यांनी पटकथा आणि संवाद लेखन केलं आहे. केदार फडके यांनी छायांकन, देवेंद्र भोमे, चिनार-महेश यांनी संगीत, महेश कुडाळकर यांनी कला दिग्दर्शकाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात जितेंद्र जोशी एन्काउंटर स्पेशलिस्टच्या प्रमुख भूमिकेत असून, सिद्धीरुपा करमरकर, जुई भागवत, प्रियांका पालकर, मयूर खांडगे, अभिजित झुंजारराव, रुपा मांगले, नितीन भजन, गुरुराज कुलकर्णी, योगेश केळकर, प्रदीप डोईफोडे, रसिकराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. "मॅजिक" चित्रपटाच्या टीजरमध्ये पोलिस स्टेशनमध्ये आपल्याच विचारांत गर्क असलेला जितेंद्र जोशी आपल्याला दिसतो. त्यानंतर त्याच्यासमोर एक मुलगी येते, पण ती त्याला धूसर दिसते असा हा टीजर आहे. मात्र, या दरम्यान त्याच्या मनातली घालमेल , भावभावना चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसतात. पार्श्वसंगीत म्हणून वापर केलेली घड्याळाची टिकटिक अंगावर काटा आणते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नवदीप सोसायटीत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**धायरी (आरंभ पर्व) :** सिंहगड रोड परिसरातील नऱ्हे येथील मानाजी नगर मधील नवदीप सोसायटीतील बुद्ध विहारात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा घेण्यात आली. बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमास सुरवात करण्यात आली. सिंहगडरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलिप दाइंगडे,पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विकास दांगट, माजी नगरसेवक हरिदास चरवड,सागर भुमकर, शरद दबडे, कोमल सुशांत कुटे,यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन विष्णु कदम होते. मस्तान जाधव, राज कदम, बाबासाहेब कदम, विशाल शिलवंत, विशाल वाघमारे, अमित कदम, प्रतिक कदम,वंदना कदम,संध्या कदम, अनिता पानसरे,मानसी कदम, राधिका कदम इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब कदम यांनी केले.




### बावधनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**पुणे(आरंभ पर्व) :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), विकास प्रतिष्ठान आणि सुजाता महिला मंडळ बावधन यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ नगर, बावधन बुद्रुक येथे महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर सर्व उपस्थितांनी सामुदायिक बुद्ध वंदना सादर केली. या प्रसंगी बावधन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते, पेरीविंकल ग्रुप ऑफ स्कूल्सचे चेअरमन राजेंद्र बांदल, माजी नगरसेवक किरण दगडे पाटील, युवा नेते सूर्यकांत भुंडे,माजी सरपंच वैशाली कांबळे, रिपाइं (आठवले) महाराष्ट्र प्रदेश युवक आघाडीचे संघटक उमेश कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा, सामाजिक क्रांतीतील योगदानाचा आणि बौद्ध मूल्यांच्या प्रसारातील भूमिकेचा उल्लेख करत आपले मनोगत व्यक्त केले. सभेत सिद्धार्थ नगरमधील उपासक–उपासिका, स्थानिक नागरिक आणि बावधन परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. अभिवादन कार्यक्रमानंतर बावधनमधून शेकडो भीमसैनिक चैत्यभूमी, दादर (मुंबई) येथे डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी रवाना झाले.



### नऱ्हे मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांची ‘जांबोरी’मध्ये उत्कृष्ट कामगिरी

**धायरी (आरंभ पर्व) :** पुणे महापालिकेच्या शिक्षण विभागातील नऱ्हे परिसरातील मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली चमक दाखवत लखनौ येथे झालेल्या १९ व्या राष्ट्रीय स्काऊट-गाईड जांबोरी आणि ग्रँड फायनल डायमंड ज्युबिली स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. २३ ते २९ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या या भव्य जांबोरीत देशातील २७ राज्ये व ४ देशांमधील तब्बल ३५ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. पुणे जिल्ह्यातून निवडलेल्या ८० स्काऊट व ८० गाईडच्या चमूमध्ये नऱ्हे मनपा शाळेच्या आठ विद्यार्थ्यांनी उत्साह, शिस्त आणि कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधले. संचलन, शोभायात्रा, सामूहिक नृत्य, फूड प्रदर्शन, नाईट हाइक, पायोनियरिंग प्रोजेक्ट अशा विविध उपक्रमांत त्यांनी उत्तुंग कामगिरी केली. विशेषतः तंबू सजावट स्पर्धेत सर्वाधिक गॅजेट्स तयार करून प्रथम क्रमांक पटकावणे ही शाळेची अभिमानास्पद कामगिरी ठरली. कॉन्टिजेन्ट लीडर संतोष मादगुडे यांनी या यशाचे कौतुक केले. तसेच ॲडव्हेंचर व इंटिग्रेशन ॲक्टिव्हिटीमध्येही विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय जांबोरी अवॉर्ड मिळवला.





दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

रविवार, दि. ०७ डिसेंबर २०२५







# वाहतूक समस्येबाबत तातडीने उपाययोजना करा

## राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या पालिका व पोलीस प्रशासनाला सूचना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा येथे दररोज सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत उपाययोजना करण्यासाठी पालिका व पोलीस प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिल्या आहेत. आज सकाळी चाकणकर यांनी धायरी फाटा येथे अधिकाऱ्यांसह पाहणी करुन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यानूसार उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त विजय वाघमोडे, सिंहगड रोड वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी सुनील गवळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पोकळे, भूपेंद्र मोरे,सागर कोल्हे, यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.







धायरी फाटा येथे सकाळ संध्याकाळ प्रयेजा सिटीकडून येणाऱ्या वाहनांचा लोंढा, अस्ताव्यस्त उभी असलेली वाहने, मनमानी करत चौकात उभे राहणारे रिक्षाचालक, नियम मोडून विरुद्ध दिशेने येणारी वाहने यांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. याचा फटका दररोज कामावर जाणारे नागरिक, विद्यार्थी यांना सहन करावा लागतो. प्रशासन गांभीर्याने लक्ष देत नसल्याने दिवसेंदिवस ही समस्या अधिक गंभीर होत चालली आहे.

वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत नागरिक तीव्र संताप व्यक्त करत असल्याने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच कोणतीही कारणे न देता ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. यावर तात्काळ कार्यवाही करू असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

## डंपरमधून लोखंडी सळई रस्त्यावरून फरफटत नेण्याची विचित्र पद्धत

**वरदाडे-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

रिंगरोड कामासाठी वापरल्या जाणाऱ्या डंपर वाहनांतून लोखंडी सळया थेट रस्त्यावर फरफटत नेण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठेकेदारांकडून वाहतूक सुरक्षिततेच्या नियमांची अवहेलना करत अशा प्रकारे सामग्री हलविण्यात येत असल्याने नागरिक, दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांच्या जिवीतास गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पानशेत रस्त्यावरून वरदाडे फाटा फरफटत जाणाऱ्या या सळयांमुळे अपघाताची शक्यता प्रचंड वाढली असून अनेकजण थरार अनुभवत प्रवास करत आहेत. वाहतूक नियमांनुसार अशा प्रकारे बाहेर लोंबकळणारे किंवा जमिनीवर ओढले जाणारे लोखंडी साहित्य वाहून नेणे पूर्णतः बेकायदेशीर असून यावर तत्काळ कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी ठेकेदार कंपनीचा बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणाकडे लक्ष वेधत संबंधित विभागाकडून तातडीने तपास व दंडात्मक कारवाईची मागणी केली आहे.

## एलआयसी म्युच्युअल फंडाचे पिंपरी येथे नवीन क्षेत्रीय कार्यालय

**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

एलआयसी म्युच्युअल फंडाने पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे आपले नवीन क्षेत्रीय कार्यालय (एरिया ऑफिस) सुरू करीत असल्याची घोषणा केली. ज्यामुळे महाराष्ट्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरी आणि औद्योगिक केंद्रांपैकी एक असलेल्या या परिसरात या फंड घराण्याची उपस्थिती बळकट झाली आहे. हे नवीन कार्यालय कंपनीच्या विस्तार धोरणात आणि संपूर्ण प्रदेशातील गुंतवणूकदार, वितरक आणि चॅनेल भागीदारांसाठी सुलभता सुधारण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



एलआयसी म्युच्युअल फंडाने केलेल्या अंतर्गत मूल्यांकनानुसार, पिंपरी चिंचवड परिसरात समभागसंलग्न गुंतवणूक मालमत्ता (इक्विटी एयूएम - ॲसेट्स अंडर मॅनेजमेंट) अंदाजे २५,००० कोटी रुपये आहे. हे वाढत्या आर्थिक जागरूकता आणि विस्तारित संपत्ती निर्मितीच्या संधींमधून परिवर्तित झालेल्या मजबूत आणि परिपक्व गुंतवणूकदार बाजारपेठेचे प्रतिबिंब आहे. एलआयसी म्युच्युअल फंड सध्या या प्रदेशात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार, अंदाजे १४५ कोटी रुपये एयूएम व्यवस्थापित करते, ज्यापैकी अंदाजे १४० कोटी रुपये हे इक्विटी एयूएम आहे. क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापनेसह, कंपनीचे उद्दिष्ट या वाढप्रवण बाजारपेठेत प्रवेश वाढवणे आणि किरकोळ गुंतवणूकदारांसाठी सेवा वाढवणे असे आहे. हे कार्यालय पिंपरी चिंचवड आणि लोणावळ्यापर्यंत पसरलेल्या आसपासच्या ठिकाणांपर्यंत सेवा पुरवेल, परिसरातील म्युच्युअल फंड वितरक, चॅनेल भागीदार आणि बँकांना मदत करेल. नवीन क्षेत्रीय कार्यालयाच्या उद्घाटनाबद्दल भाष्य करताना, एलआयसी एमएफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. रवी कुमार झा म्हणाले, "पिंपरी चिंचवड हे वेगाने वाढणारे गुंतवणूक केंद्र आहे आणि आमचे नवीन क्षेत्रीय कार्यालय येथील वाढत्या गुंतवणूकदारांना सेवा देण्याची आमची क्षमता मजबूत करणार आहे. विश्वासार्ह सल्ला आणि अखंड सेवेसह दीर्घकालीन संपत्ती निर्मितीमध्ये सहभागी होण्यासाठी अधिकाधिक कुटुंबांना प्रोत्साहित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे."

## शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. उद्योजकता विकास मेळावा, क्रिकेट स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल, निबंध स्पर्धा आदी कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती माजी जिल्हा परिषद सदस्या सुरेखाताई दमिष्टे यांनी दिली. प्रसंगी सोशल मीडिया सेलचे अध्यक्ष निलेश दमिष्टे, कार्यकर्त्या अर्चना कुभांरकर, नंदिनी कुंभारकर, कुसुम लोणारे, सुनिता चाकणकर आणि वैशाली दमिष्टे आदी उपस्थित होते.




सुरेखाताई दमिष्टे म्हणाल्या, "शरदचंद्र पवार साहेब हे देशाचे आदरणीय नेते आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या ३० वर्षांपासून या भागात आम्ही १२ डिसेंबरला विविध समाजोपयोगी उपक्रम घेत असतो. यंदा आठवडाभर हे उपक्रम चालणार आहेत. देशात बेरोजगारांची संख्या मोठी आहे. तसेच अलीकडे स्टार्टअप संस्कृती विकसित होत आहे. त्यामुळे समाजातील तरुणांमधील उद्योजक घडवण्यासाठी व्यावसायिक मेळाव्याचे आयोजन केले आहे. व्यावसायिक मेळावा १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांतदादा जगताप व माजी आमदार कुमारभाऊ गोसावी यांच्या उपस्थितीत असून, या मेळाव्यात उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन आहेत."

"विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल १४ डिसेंबर रोजी शिवाजीनगर येथील एव्हिएशन गॅलरी, पर्वती येथील क्रिकेट संग्रहालय येथे आयोजित केली आहे. क्रिकेट स्पर्धा १६ व १७ डिसेंबर रोजी वडगाव आणि धायरी येथील क्रीडांगणावर होणार आहेत. त्याचदिवशी विविध शाळांमध्ये निबंध स्पर्धा होणार आहेत. यासह इतर सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. स्पर्धेत सहभागींना रोख पारितोषिके, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे," असे निलेश दमिष्टे यांनी नमूद केले.





# राजगड तालुक्यात बोगस कामाचा मोठा घोटाळा उघड

## सौर हायमर दिवे न बसवता दहा लाखांचा निधी लाटल्याचा आरोप

**राजगड तालुका-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

वेल्हे बुद्रुक ग्रामपंचायतीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक योजनेअंतर्गत सन 2024-25 या वर्षासाठी 2 सौर हायमर दिवे मंजूर करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात सदर दिवे बसवलेच न जाता खोटे जिओ टॅग फोटो, बोगस पत्रे आणि ग्रामसेवकाची बनावट सही वापरून संबंधित ठेकेदार जी. के. एजन्सी, भोसरी यांनी जिल्हा परिषदेकडून तब्बल १० लाख रुपये निधी काढल्याचा गंभीर घोटाळा उघड झाला आहे.




ही माहिती मिळाल्यानंतर आज (बुधवार, दि. ३) माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद बाळासाहेब देशमाने यांनी घटनास्थळी पाहणी केली असता धक्कादायक बाब समोर आली. दोन्ही ठिकाणी सौर हायमर दिवे बसवलेले नसून, त्या दिव्यांचे साहित्य गेल्या सहा महिन्यांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोरच अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले असल्याचे निदर्शनास आले.

याबाबत ग्रामपंचायत वेल्हेचे सरपंच सीता नंदकुमार खुळे, तसेच सदस्य संदीप नगीने, सुनील कोळपे, नवनाथ दनाने, ग्रामसेवक, माजी उपसरपंच खंडू गायकवाड, माजी उपसरपंच सुनील राजीवडे, सामाजिक कार्यकर्ते रुपेश पवार, विलासराव पांगरे यांच्यासह सर्वांनी ठेकेदाराकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे सांगितले.

पुढे माहिती घेताना जिल्हा परिषद, पुणे येथील सुहास संचेती यांनी संबंधित विभागातील बिलांची पाहणी केली असता, ठेकेदाराने "काम पूर्ण" झाल्याची कागदपत्रे (जिओ टॅग फोटो व पत्रे) सादर करूनच निधी उचलल्याचे स्पष्ट झाले.

त्याहून गंभीर बाब म्हणजे, या कागदपत्रांवरील ग्रामसेवकाची सही व शिक्का तपासला असता तत्कालीन ग्रामसेवक अजित खंडू कुंभार यांनी ती सही व शिक्का माझे नसल्याचे स्पष्टपणे सांगितले, असा खुलासा याठिकाणी उपस्थितांसमोर करण्यात आला.

या प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता हा सरळसरळ फसवणूक, बनावट दस्तावेज तयार करणे आणि सरकारी निधीची चोरी असल्याचे देशमाने यांनी ठामपणे सांगितले.




त्याअनुषंगाने संबंधित जी. के. एजन्सी या ठेकेदाराविरुद्ध IPC 420 सह अन्य संबंधित कलमानुसार गुन्हा तातडीने दाखल करावा आणि त्याचे नोंदणीकृत परवाना/रजिस्ट्रेशन रद्द करावे, अशी जोरदार मागणी माजी जि.प. सदस्य आनंद बाळासाहेब देशमाने यांनी केली आहे.

घटनास्थळी झालेल्या पाहणीस सरपंच, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांच्या समोरच साहित्य पडून असून दिवे बसवलेले नसल्याची वस्तुस्थिती स्पष्ट झाली.

या प्रकरणामुळे ग्रामपंचायत वेल्हे परिसरात मोठी खळबळ उडाली असून आता जिल्हा परिषदेची पुढील कारवाई काय होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे



### किरकटवाडीतील ज्ञानदा विद्यालयात भव्य क्रीडा स्पर्धांची उत्साहात सुरुवात

**पुणे (आरंभ पर्व) :** नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे-३० संचालित ज्ञानदा प्रशाला, किरकटवाडी येथे क. मामा साहेब मोहोळ स्मृतिदिनानिमित्त भव्य क्रीडा स्पर्धांना आज उत्साहपूर्ण सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे रमेशअण्णा करंजावणे यांच्या हस्ते नारळ फोडून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य एल. सी. खुणे सर, ज्ञानदा प्रशाला कमिटीचे रोहिदास हगवणे, किरण हगवणे, प्रशांत हगवणे, दशरथ करंजावणे, तसेच कार्याध्यक्ष पवन करंजावणे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षिका पायगुडे, संदेश पवार, श्री. बरडे धनाजी बाबुराव, सौ. संपदा गायकवाड, सौ. रोहिणी बादाडे, सौ. आवटी मॅडम, सौ. शिंदे मॅडम, तसेच श्री. रवीभाऊ खालकर यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. धावण्याच्या शर्यती, खो-खो, कबड्डी अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मैदानावर विद्यार्थ्यांचा उत्साह, स्पर्धेतील जिद्द आणि क्रीडा भावना ओसंडून वाहताना दिसली. शिक्षकमंडळी, ग्रामस्थ आणि आयोजकांच्या पुढाकाराने संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. स्मृतिदिनाचे औचित्य राखत किरकटवाडी येथील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

### मॅरेथॉनमध्ये गंभीर अनियमितता; लाखो रुपयांचे अनुदान?

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे महानगरपालिकेकडून दरवर्षी वितरित केले जाणारे अनुदान, प्रशासकीय मंजुरी, समिती अहवाल आणि इतर संबंधित परवानग्यांमध्ये गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप विविध नागरिक संघटनांनी केला आहे. या संदर्भात सत्यशोधक बहुजन आघाडीतर्फे मनपा आयुक्तांकडे आज लेखी तक्रार दाखल करण्यात आली. संघटनेच्या म्हणण्यानुसार, 07 डिसेंबर 2025 रोजी आयोजित 39 वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ही कोणत्याही अधिकृत क्रीडा संस्थेकडून — राज्य क्रीडा विभाग, महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन किंवा Athletics Federation of India (AFI) — मान्यताप्राप्त नाही. मान्यता नसतानाही पुणे महानगरपालिका लाखो रुपयांचे अनुदान देत असल्याबाबत गंभीर शंका व्यक्त करण्यात आली आहे. तक्रारदारांनी स्पष्ट मागणी केली आहे की, "चौकशी पूर्ण होईपर्यंत पुणे महानगरपालिकेचे कोणतेही अनुदान मॅरेथॉन आयोजक संस्थेला देऊ नये." संघटनेचे प्रतिनिधी निलेश बबन वाघमारे यांनी सांगितले की, "मान्यता नसलेल्या स्पर्धांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क्स, क्रीडा कोटा किंवा कोणताही शासकीय लाभ मिळत नाही. यामुळे विद्यार्थ्यांची दिशाभूल होते आणि तरीही मनपाकडून लाखो रुपये देणे म्हणजे सरळसरळ भ्रष्टाचार आहे." तक्रारीत हेही नमूद करण्यात आले आहे की मनपाच्या शाळा आणि क्रीडा विभागांमध्ये विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजांसाठी निधी अपुरा पडतो; अशा वेळी खासगी मॅरेथॉन स्पर्धेसाठी मोठी रक्कम खर्च करणे हा जनतेच्या पैशांचा दुरुपयोग असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




## पुण्यात प्रभाग ३३ मध्ये बंपर 'लकी ड्रॉ'ची जोरदार चर्चा

- 'कॉमेडी तडका होम मिनिस्टर' कार्यक्रमात तब्बल १५० बक्षिसे, पहिल्या क्रमांकासाठी टाटा टिएगो!
- मा . जिल्हा परिषद सदस्य अनिता इंगळे आणि मा . नगरसेवक सोपान काका चव्हाण यांची माहीती

पुणे (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३३ मध्ये होणाऱ्या बंपर "लकी ड्रॉ" कार्यक्रमाची शहरभरात जोरदार चर्चा रंगू लागली आहे. खास आकर्षण ठरणार आहे कॉमेडीकिंग अभिनेता ओम यादव प्रस्तुत "कॉमेडी तडका होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा" हा धमाल कार्यक्रम. या विशेष उपक्रमात नागरिकांना भरघोस भेटवस्तूंची पर्वणी मिळणार असून प्रथम क्रमांकाचे बक्षीस म्हणून टाटा टिएगो चारचाकी गाडी ठेवण्यात आली आहे. याशिवाय इतर १५० पेक्षा अधिक मनमोहक बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमात उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक माता-भगिनींसाठी एक कपबशी सेट भेट स्वरूपात देण्यात येणार असल्याने महिलांमध्येही उत्सुकता वाढली आहे. प्रभागात उत्सवी माहोल निर्माण करणारा हा उपक्रम नागरिकांच्या सहभागाने अधिक रंगतदार होईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

## ५०० रुपयांच्या नोटांवर 'MOHAMAD' असा शिक्का




पुणे (आरंभ पर्व) : शहरात आणि परिसरात ५०० रुपयांच्या नोटांवर 'MOHAMAD' असा शिक्का मारलेले चलन फिरत असल्याची माहिती समोर आली असून बँकांकडून अशा नोटा स्वीकारल्या जात नसल्यामुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. सोशल मीडियावरही या नोटांचे फोटो मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, काही विघ्नसंतोषी किंवा फसवेगिरी करणारे लोक नोटांवर शिक्का मारून त्या सहजपणे बाजारात वापरण्याचा प्रयत्न करत आहेत. बँकिंग नियमांनुसार, चलनावर कोणत्याही प्रकारची अनधिकृत नोंद, शिक्का किंवा मोहोर असलेली नोट संशयित मानली जाऊ शकते. अशा नोटांची तपासणी होईपर्यंत त्या स्वीकारल्या जात नाहीत, त्यामुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. बँकांनीही सावधगिरीचा सल्ला दिला असून, ५०० रुपयांची नोट स्वीकारताना नीट तपासणे, शिक्का किंवा असामान्य खूण दिसल्यास व्यवहार टाळणे, तसेच शक्य असल्यास अशा नोटांची तक्रार जवळच्या बँक शाखेत किंवा पोलिसांकडे देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या काही प्रमाणात अशा नोटा बँकांमध्ये जमा होऊ लागल्या आहेत, म्हणून नागरिकांनी सतर्क राहून फसवणुकीपासून बचाव करावा, असा इशारा दिला जात आहे.



## रामेश्वरधाम मंदिराचा वर्धापनदिन साजरा

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : जऊळके ( ता.खेड ) येथे रामेश्वरधाम मंदिराचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी हरिनाम व टाळ मृदुंगाच्या गजरात गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. दोन दिवस साजरा झालेल्या या सोहळ्याला भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे मंदिराचे प्रमुख विश्वस्त नाथभक्त मंगेश महाराज आडवळे यांनी सांगितले. रामेश्वर मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त फुलांची आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. देवाचा अभिषेक, होमहवन, हरिपाठ व रात्री ह.भ.प. नारायण महाराज काळे यांचे किर्तन, नाथ भक्तीगीते, रहाडी होम, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ह.भ.प. तुकाराम महाराज घाडगे यांचे काल्याचे कीर्तन झाले.याप्रसंगी भाविकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. याप्रसंगी खरेदी विक्री संघाचे संचालक कचरदास येवले, माऊली ढेरंगे, सुरेश येवले, गणेश येवले, नाथ सांप्रदायाचे महाराज व भक्तगण, तसेच परिसरातील नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन नाथभक्त गुरुवर्य मंगेश महाराज आडवळे, चांगभलं ग्रुप व ग्रामस्थांनी केले.

# धायरीमधील 'पुष्पा' कोण?

### 'पुष्पा' स्टाईल चोरी? : दमिष्टे मळ्यातील चंदनाचे झाड गायब





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

शांत आणि सुंदर वातावरणासाठी ओळखला जाणारा दमिष्टे मळा आता चंदन चोरीमुळे चर्चेत आला आहे. बहुचर्चित पुष्पा सिनेमातील दृश्यांची आठवण करून देणारी ही घटना घडली असून मळ्यातील चंदनाच्या झाडांपैकी एक झाड मुख्य गाभा चेक करुन कापून नेल्याचे निदर्शनास आले आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्या सुरेखाताई दमिष्टे(पोकळे) यांच्या मालकीच्या या मळ्यात दररोजची पाहणी केली जात असते. मात्र एका झाडाचा बुंधा व कत्तल केलेले झाड जमिनीवर तसेच दिसल्याने चोरी उघडकीस आली.

ही धक्कादायक माहिती निलेश दमिष्टे यांनी दिली. चंदन हे महागडे असल्यामुळे त्यावर चोरट्यांची नजर असतेच, पण धायरीसारख्या नागरी भागात अशा प्रकारे झाडाची थेट कत्तल करून चोरी करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते हे काम साध्या व्यक्तींचे नसून नियोजनपूर्वक टोळीने केले असावे, अशी चर्चा सुरू आहे.

निलेश दमिष्टे म्हणाले की, "आज एका झाडाचा बुंधा कापलेला दिसला... उद्या दुसरी झाडेही चोरीला जाऊ नये याची काळजी घेणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. भविष्यात इतर झाडांची चोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही."

त्यांनी पोलिस प्रशासनाला तत्काळ दखल घेण्याची आणि हा प्रकार थांबवण्याची मागणी केली आहे. मळ्याभोवती सुरक्षा वाढविणे, गस्त ठेवणे आणि सीसीटीव्ही तपासण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली.

"धायरीमध्येही पुष्पाची एन्ट्री झाली काय?" या घटनेनंतर परिसरात अशीही चर्चा ऐकायला मिळत आहे.. तपासानंतरच या धक्कादायक चोरीमागील हात उघड होणार आहेत.

## भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त वह्या वाटप




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला महानगरपालिका शाळा क्रमांक दोन येथे विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण व्हावी आणि शैक्षणिक वाटचालीला हातभार लागू शकेल, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन खडकवासला भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. सविता रमेश गायकवाड आणि भाजप ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड यांनी केले.

या प्रसंगी भाजपा मंडलाध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, माजी सरपंच संतोषदादा मते, भगवानराव मोरे ,महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषाताई मोरे, अध्यक्ष रश्मीताई घुले पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाऊ मते, धनश्रीताई कोल्हे, प्रिती करमरकर, खडकवासला शाळेचे मुख्याध्यापक सय्यद सर तसेच आणि इतर मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वह्या स्वीकारताना आनंद व्यक्त केला असून, पालक आणि शिक्षकांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## आघाडीचे सर्वाधिकार पवारांना!

### पक्षाच्या बैठकीत निर्णय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी करायची की नाही, या विषयावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या 'कोअर समिती'च्या बैठकीत शनिवारी जोरदार चर्चा झाली. आघाडी करण्यावरून उपस्थित पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी जोरात भूमिका मांडली. अखेर आघाडी करण्याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना देण्याचा ठराव मंजूर केल्यावर सुमारे तीन तास सुरू असलेली बैठक आटोपली. महापालिका निवडणुकीसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी करण्यावरून पक्षात गेले अनेक दिवस चर्चा सुरू आहे. याबाबत व्यक्त होत असलेल्या प्रतिक्रियांमधून नेते, कार्यकर्ते यांच्यातील मतभेदही उघड होत आहेत.

कार्यकर्त्यांना सक्रिय ठेवण्यासाठी आघाडी आवश्यक आहे, विकासकामे करायची असतील तर, सत्तेत सहभाग हवा, एकत्र लढल्यास महापालिकेची सत्ता मिळवता येईल, पक्षाची स्थानिक स्तरावर ताकद वाढेल, असे मुद्दे आघाडीच्या बाजूने असलेल्यांनी मांडले.

## अंदमान-निकोबारमध्ये देशभक्तीचा भव्य सोहळा

- "सागरा प्राण तळमळला..." काव्याला 116 वर्षे पूर्ण – स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक समारोह 12 डिसेंबरला




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहात देशभक्तीचा उत्साह साकारणारा भव्य सोहळा होणार आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अमर काव्य "सागरा प्राण तळमळला..." या कालजयी रचनेला 116 वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने 12 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 3.00 वाजता श्री विजयपुरम, पोर्ट ब्लेअर येथे "सागर प्राण तळमळला" नावाचा स्मारक समारोह आयोजित करण्यात आला आहे.

या प्रसंगी बेओदानाबादच्या समुद्रकिनारी उभारण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या भव्य स्मारक प्रतिमेचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूजनीय डॉ. मोहन भागवत यांच्या करकमलातून, केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री श्री अमित शाह यांच्या मान्यवर उपस्थितीत होणार आहे.

स्मारक प्रतिमेची संकल्पना व निर्मिती मुंबईस्थित वैल्युएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेटे यांनी केली आहे. ही प्रतिमा सावरकरांचे अटळ राष्ट्रवाद, त्याग आणि निर्भीक विचारधारा यांचे प्रेरणादायी प्रतीक म्हणून उभी राहणार आहे. प्रतिमेची निर्मिती महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिध्द मूर्तिशिल्पकार श्री राम सुतार यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती-तंत्रज्ञान मंत्री अधिवक्ता अशिष शेलार यांची या कार्यक्रमात विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या सोहळ्याच्या महतीत भर घालण्यासाठी पद्मभूषण पं. हृदयनाथ मंगेशकर, उषा ताई मंगेशकर, रणदीप हुड्डा, डॉ. विक्रम सम्पत, तसेच अभिनेते शरद पोंक्षे यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित राहून कार्यक्रमाचे सौंदर्य खुलवतील.

## सिंहगड करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर आणि जिल्हा परिसरातील क्रीडाप्रेमींसाठी प्रतिष्ठेची ठरलेली सिंहगड करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा यावर्षी २५ व्या वर्षात पदार्पण करत असून, या स्पर्धेचे भव्य उद्घाटन कार्यसम्राट आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या शुभहस्ते उत्साहवर्धक वातावरणात संपन्न झाले. माजी नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी उत्साहात आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा गेल्या पंचवीस वर्षांपासून पुणे शहर आणि जिल्ह्यातील एक प्रतिष्ठेची स्पर्धा म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करत आली आहे. क्रीडा, शिस्त, संघभावना आणि युवा पिढीला एक सकारात्मक व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने सिंहगड करंडक स्पर्धा सातत्याने यशस्वीपणे आयोजित केली जात आहे. उद्घाटनप्रसंगी आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी आयोजकांचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "स्थानिक पातळीवर होत असलेल्या अशा स्पर्धांमुळे तरुणांना प्रोत्साहन मिळते तसेच सामाजिक ऐक्य आणि क्रीडा संस्कृती बळकट होते." या कार्यक्रमास विविध क्रीडापटू, स्थानिक नागरिक, मान्यवर व स्पर्धक संघ यांची उपस्थिती लाभली. हरिदास चरवड यांनी हे नेहमी क्रीडा क्षेत्रासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे त्यामुळे अनेक खेळाडू या भागात घडल्याचे आ तापकीर यांनी सांगितले.

## भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडीत खाऊ वाटप उपक्रम



**खडकवासला(दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला परिसरातील अंगणवाडी क्रमांक 170 मध्ये लहान बालकांना खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. लहानग्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, त्यांच्या पोषणाची आणि आनंदाची काळजी घ्यावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन खडकवासला भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. सविता रमेश गायकवाड आणि भाजप ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमास भाजपा मंडलाध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, माजी सरपंच संतोषदादा मते, महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषाताई मोरे, अध्यक्ष रश्मीताई घुले पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाऊ मते, धनश्रीताई कोल्हे, प्रिती करमरकर तसेच अंगणवाडी सेविका व मातृमंडळाच्या सदस्यांची उपस्थिती होती. लाडू, बिस्किटे, चॉकलेट्स यांसह पौष्टिक खाऊ देण्यात आला. बालकांनी आनंद व्यक्त करत टाळ्या वाजवत स्वागत केले. पालक आणि अंगणवाडी सेविकांनी हा उपक्रम उपयुक्त व कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

अशा उपक्रमांमुळे समाजातील लहान मुलांमध्ये आनंद, प्रोत्साहन आणि सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## बिबट्याच्या हालचालींचा संशय

- मा. सभापतींच्या शेत परिसरात ताज्या पावलखुणा
- गावकऱ्यांनी सतर्क राहावे – धनराज जोरी यांचे आवाहन

**मालखेड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

गावात वन्यजीवांच्या वावराने पुन्हा एकदा चिंता वाढली आहे. मालखेड गावातील मा. सभापती यांच्या शेत परिसरात आज सकाळी बिबट्याच्या ताज्या पाऊलखुणा आढळल्या. पाऊलखुणा स्पष्ट दिसत असल्याने बिबट्या परिसरात फिरत असल्याचे संकेत मिळाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच धनराज जोरी यांनी तातडीने पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आणि वनविभागाला माहिती देण्यात आली.

पाहणीदरम्यान माजी सरपंच राजेंद्र आप्पा जोरी, युवराज जोरी, राहुल जोरी, विपुल जोरी, मंगेश श्रीसागर, सुरज भालेराव यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांनी मिळून घटनास्थळाची पाहणी करत बिबट्याच्या हालचालीबाबत चर्चा केली.

धनराज जोरी यांनी ग्रामस्थांना पुढील सूचना दिल्या— रात्री एकटे बाहेर पडू नये शेतकऱ्यांनी पहाटे किंवा रात्री शेतीकडे जाताना गटाने जावे लहान मुलांना घराबाहेर एकटे सोडू नये पशुधन सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावे



कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास ताबडतोब वनविभागाला कळवावे या घटनेमुळे मालखेड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाकडून पुढील पाहणी सुरू आहे. ग्रामस्थांनी शांतता राखून योग्य खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'श्रावण बाळ' संदीपभाऊ मते केंद्रस्थानी

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून लढणार असल्याचे केले जाहीर!!!
- राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणार असल्याचे संदीप मते यांचे मत



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभपर्व पुणे मिशन महानगरपालिका सदरामध्ये प्रभाग क्रमांक 33 साठी प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जाणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते संदीपभाऊ मते यांच्याशी संवाद साधला असता, त्यांची लोकप्रियता आणि जनाधार किती मोठा आहे याची प्रचिती पुन्हा एकदा आली. समाजकारणात झोकून देणारे आणि हजारो महिलांना यात्रांच्या माध्यमातून सेवा करणारे संदीपभाऊ आज खडकवासल्यामध्ये प्रेमाने "श्रावण बाळ" म्हणून ओळखले जात आहेत. संदीपभाऊंनी जवळपास दहा हजार महिला भगिनींना उज्जैन महाकाल यात्रा घडविण्याचा संकल्प केला आहे. ही यात्रा फक्त धार्मिक नव्हे, तर महिलांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या सहभागातून समाजामध्ये बंध वाढवणारा उपक्रम ठरत आहे. त्यामुळे महिलांकडून त्यांना प्रचंड पाठिंबा मिळताना दिसतो.

खडकवासल्यातील एका साध्या कुटुंबातील मुलगा—भाजी विक्री करून घर खर्च भागवणारा—हा तरुण आज समाजकारणाचा चेहरा बनला आहे. व्यवसायात स्थिरावल्यानंतर त्यांनी लोकांसाठी काम करण्याचा ध्यास घेतला आणि त्यातूनच त्यांनी खडकवासल्याचे उपसरपंचपद तसेच हवेली तालुका शिवसेनाप्रमुख अशी महत्त्वाची पदे भूषवली. ईश्वर खडकवासला विधानसभा मतदारसंघातूनही शिवसेनेकडून ते इच्छुक होते.

समाविष्ट गावांमध्ये त्यांचे सर्वांसोबत अत्यंत आत्मीयतेचे नाते आहे. प्रत्येक घराशी जोडलेले नाते, सर्वांसाठी सतत उपलब्ध असणारी कार्यशैली आणि समस्यांवर तातडीने प्रतिसाद देण्याची वृत्ती यामुळे नागरिकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आदर आहे. महिलांकडून व नागरिकांकडून "संदीपभाऊ नगरसेवक व्हायलाच हवेत" अशा प्रतिक्रिया सातत्याने उमटत आहेत. दरम्यान, पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे, खासदार संजय राऊत, उपनेत्या सुषमाताई अंधारे, संपर्कप्रमुख आ. सचिन अहिर तसेच शिवसेनेतील वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे असलेले दृढ संबंध पाहता प्रभाग 33 मधील त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित असल्याच्या चर्चा जोर धरत आहेत. पक्षांतर्गतही त्यांचा वाढता प्रभाव आणि संघटनात्मक क्षमता लक्षात घेता संदीपभाऊ हेच प्रमुख दावेदार ठरतील, असे चित्र स्पष्ट होत आहे.

राजकारणात अनिश्चितता असली तरी जनसेवेत संदीपभाऊंचा स्वर नेहमीच स्पष्ट आहे. इतर पक्षांकडून ऑफर येत असतानाही त्यांनी ठामपणे "मी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडूनच निवडणूक लढवणार" असे स्पष्ट जाहीर केले आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण या तत्त्वावर ते आजही काम करत आहेत.

संदीपभाऊ म्हणतात, "समाविष्ट गावांवर महानगरपालिकेकडून अन्याय होत आहे. मुलभूत सुविधांसाठी लढा देणारा, लोकांशी जोडलेला आणि खऱ्या अर्थाने जनतेचा प्रतिनिधी महानगरपालिकेत गेला पाहिजे. हा भाग बदलण्यासाठी झपाटून काम करणारा कार्यकर्ता मीच आहे, असा माझा विश्वास आहे."

या सर्व घडामोडींमुळे प्रभाग 33 मधील निवडणूक विशेष लक्षवेधी ठरणार आहे. संदीपभाऊंचा वाढता जनाधार, पक्षश्रेष्ठींचा विश्वास आणि स्थानिक पातळीवरील घट्ट पकड यामुळे या प्रभागातील समीकरणांमध्ये मोठा बदल होत असल्याचे सर्वांच्या चर्चेत आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



## दत्त जयंतीनिमित्त एकता युवक संघाचा अन्नदान व फळवाटप उपक्रम

खानापूर/गोळेवाडी-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : श्री दत्त जयंतीनिमित्त एकता युवक संघाच्या वतीने विविध आश्रम व वस्तीमध्ये अन्नदान व फळवाटपाचे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष संघदिप शेलार व उस्तवार प्रमुख नचिकेत जगताप यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. सेवाधाम वृद्धाश्रम (गोळेवाडी), सिटीझन वर्ल्ड, खानापूर, स्वामी अंगण वृद्धाश्रम तसेच डोणजे–तानाजी नगर येथील कातकरी वस्ती येथे लाभार्थ्यांना अन्नदान व फळांचे वाटप करून दत्त जयंती समाजोपयोगी कार्यातून साजरी करण्यात आली. या उपक्रमास पीडीसीसी बँकेचे संचालक प्रविण शिंदे, लक्ष्मण माताळे, राजेंद्र पवार, स्नेहल वाल्हेकर, शुभांगी खिरिड, शशीकांत किवळे, शरद जावळकर, हेमंत पारगे, कल्पना कानगुडे, वंदना शेडे, प्रतिभा पायगुडे, मानसी सोनवणे, सुरेखा चव्हाण, अशितोष शेलार, निलेश शहा, यश जगताप, पंकज चव्हाण, रोहन वाल्मिकी आदी मान्यवरांनी उपस्थिती लावून सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमात नवनियुक्त सरपंच सौ. स्नेहल वाल्हेकर यांचा संविधान पुस्तक देऊन विशेष सन्मान करण्यात आला. दत्त जयंतीनिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## संचालकपदी अरुण कापसे यांची बिनविरोध निवड



बार्शी (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील शिखर संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर फेडरेशनच्या संचालकपदी अरुण सुबराव कापसे यांची यंदाही बिनविरोध निवड झाली आहे.1995 ते 2025 या कालावधीत सलग 30 वर्षे फेडरेशनच्या कार्यभागात सहभाग नोंदविल्यानंतर त्यांची पुनर्निवड ही सहकार क्षेत्रातील सातत्यपूर्ण अनुभवाची नोंद मानली जात आहे. या निवडणुकीत कापसे यांनी भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या 'भाजप सहकार विकास पॅनल' या गठ बंधना च्या माध्यमातून उमेदवारी दिली होती. पॅनल मधील सामूहिक धोरण आणि राज्यभरातील सहकारी संघटनांचा पाठिंबा यामुळे निवडणूक अखेर बिनविरोध पार पडली. फेडरेशन राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांना मार्गदर्शन, वितरण साखळी व्यवस्थापन, तसेच ग्राहक हिताशी संबंधित उपक्रम राबविण्याचे काम करते. या निर्णायक कामकाजात कापसे यांनी तीन दशकांपासून विविध जबाबदाऱ्या सांभाळत सातत्याने भूमिका बजावली आहे. सहकार क्षेत्रातील काही निरीक्षकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "कापसे यांनी 1995 पासून सहकार क्षेत्रात निर्माण केलेला विश्वास, संघटनात्मक समन्वय आणि दीर्घ अनुभव लक्षात घेता त्यांच्या पुनर्निवडीमुळे फेडरेशनच्या पुढील धोरणात्मक कामकाजाला गती मिळेल." या निवडीमुळे राज्यातील सहकार क्षेत्रात स्थैर्यता निर्माण होऊन, ग्राहक सहकारी संस्थांशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## भक्तीभावाने दत्तजयंती साजरी



राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील एसटी आगारात एसटी अवधूत मंडळाच्या वतीने दत्तजयंती उत्सव भक्तीभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम साजरे झाले. सकाळी दत्तात्रेय मूर्तीस लघुरुद्र अभिषेक करून महापूजा करण्यात आली. दुपारी एसटी अवधूत मंडळाचे संगित भजन, महाआरतीचा कार्यक्रम झाला. संध्याकाळी रंगनाथ महाराज नाईकडे (कडधे) यांचे दत्तजन्मावर प्रवचन झाले त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात आले. राजगुरुनगर व परिसरातील असंख्य दत्तभक्तांनी या सोहळ्याचा आणि दत्तगुरु दर्शनाचा लाभ घेतला. चिंतामण गोसावी, संतोष एरंडे, कालीदास चिखले, अनिल गोसावी, दिलीप कहाणे, पांडुरंग शिंदे, किरण मोरे, सोमनाथ आढळ, शशिकांत दळवी, दिगंबर पोटे, नंदकुमार पवार, राजेश कांबळे, गोरक्ष कोळेकर आदींनी उत्सवाचे नियोजन केले.

## बहुली गाव तंटामुक्ती समिती अध्यक्षपदी श्री. प्रदीप रमेश शिंदे



बहुली-विशाल भालेराव(आरंभ पर्व) : बहुली ग्रामपंचायत हद्दीत आज गाव तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत गायकवाड वाडीचे रहिवासी श्री. प्रदीप रमेश शिंदे यांची सर्वानुमते व बिनविरोध निवड करण्यात आली. गावातील शांतता, सुव्यवस्था आणि सलोखा जपण्यासाठी तंटामुक्ती समिती महत्त्वाची भूमिका बजावत असते. या समितीच्या अध्यक्षपदी सक्षम, सर्वमान्य नेतृत्व मिळाल्याने गावाच्या विकासाला आणि सामाजिक एकोप्याला चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या निवडीबद्दल बाहुली ग्रामपंचायत तसेच सर्व ग्रामस्थांकडून श्री. प्रदीप रमेश शिंदे यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मोहनदादा जोशी यांना बंधुत्व ग्रुपकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा

पुणे (आरंभ पर्व) : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार श्री. मोहनदादा जोशी यांच्या वाढदिवसानिमित्त बंधुत्व ग्रुपतर्फे मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी बंधुत्व ग्रुपचे अध्यक्ष श्री. मिलिंद पोकळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर चिटणीस श्री. महेंद्र भोसले तसेच बंधुत्व ग्रुपचे इतर सदस्य उपस्थित होते. मोहनदादा जोशी यांच्या सामाजिक कार्य, सर्वसमावेशक विचारसरणी आणि पुणे शहराच्या विकासातील योगदानाची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली. वाढदिवसाच्या शुभेच्छांसोबतच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.



# एमआयटी एडीटी विद्यापीठ- फिलिप्स इंडिया यांच्यात सामंजस्य करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नावीन्य, संशोधन आणि भावी काळासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठ, पुणे आणि फिलिप्स इंडिया यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. उद्योग–विद्यापीठ सहकार्य बळकट करण्याच्या दृष्टीने हा करार एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या करारांतर्गत एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'प्रोजेक्ट मॅनेजमेंट' हा विषय संरचित पद्धतीने समाविष्ट करण्यात येणार असून फिलिप्सच्या तज्ज्ञांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योग-अनुभव, तज्ज्ञ व्याख्याने, उद्योगभेटी आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील.

या करारावर स्वाक्षऱ्या करण्यासाठी फिलिप्स इंडियाकडून विस्पी काकारीयल, आशिष शाह आणि चेतन लोणकर उपस्थित होते. तर विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट प्रा. डॉ. सायली गणकर, प्र.कुलगरु डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ. स्वाती मोरे, डॉ.रेणू व्यास, डॉ. नचिकेत ठाकूर, डॉ.सुदर्शन सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना चेतन लोणकर यांनी विद्यापीठाच्या प्रगतिशील दृष्टीकोनाचे आणि प्रभावी समन्वयाचे कौतुक केले. तसेच उद्योग–विद्यापीठ सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी एमआयटी एडीटी व्यवस्थापनाने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या करारामुळे विद्यार्थ्यांसाठी परिवर्तनकारी शैक्षणिक संधी निर्माण होतील, संयुक्त संशोधनाला चालना मिळेल आणि आरोग्य तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भावी विकासात मोलाचे योगदान देता येईल, असे प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी यावेळी सांगितले.

## भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात फळे वाटप




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री जे. पी. नड्डा यांच्या वाढदिवसानिमित्त आशीर्वाद वृद्ध निवास येथे ज्येष्ठ नागरिकांना फळांचे वाटप करण्यात आले. समाजातील ज्येष्ठांचा सन्मान राखत त्यांच्यापर्यंत प्रेम, आदर आणि आपुलकी पोहोचवावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन खडकवासला भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. सविता रमेश गायकवाड आणि भाजप ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास भाजपा मंडलाध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, माजी सरपंच संतोषदादा मते, महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषाताई मोरे, अध्यक्ष रश्मीताई घुले पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाऊ मते, धनश्रीताई कोल्हे, प्रिती करमरकर तसेच वृद्धाश्रमातील व्यवस्थापन मंडळ उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांना विविध फळांचे वाटप करण्यात आले. फळे स्वीकारताना अनेकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. त्यांच्या आशीर्वादांनी वातावरण भावनिक व आनंदमय झाले. वृद्धाश्रम प्रशासन आणि ज्येष्ठांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात आदर, जिव्हाळा आणि सेवाभाव वृद्धिंगत होत असल्याचे सांगितले.

# सारोळेची प्राजक्ता शिंदे नीट २०२५ उत्तीर्ण !

- BAMS मध्ये प्रवेश मिळवत गावाचा अभिमान उंचावला

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील सारोळे हे अगदी साधं आणि शांत गाव. याच गावातील एक हुशार, शांत, अभ्यासू मुलगी — कु. प्राजक्ता शरदराव शिंदे — आज संपूर्ण गावाचा अभिमान बनली आहे. देशपातळीवर घेण्यात आलेल्या NEET 2025 या कठीण परीक्षेत ती पात्र ठरली असून तिला BAMS मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे.

आजच्या काळात मोबाईल हे बहुतेक तरुणांचे मुख्य आकर्षण झाले आहे. पण प्राजक्ताने मोबाईलपासून दूर राहून फक्त पुस्तकांमध्ये रमणं पसंत केलं. तिला पुस्तकांची खरी आवड होती. जिथे इतर मुले मोबाईलमध्ये वेळ घालवत, तिथे प्राजक्ता अभ्यासात मग्न असे. तिची ही सवय आणि एकाग्रता तिला मोठं यश मिळवून देणारी ठरली.



उस्मानाबाद येथील श्री श्री रविशंकर विद्यालय मध्ये शिकत असताना प्राजक्ताने NEET देण्याचा निर्णय घेतला. स्पर्धा परीक्षांची भीती अनेकांना वाटते, पण प्राजक्ताने भीतीपेक्षा जिद्दीला महत्व दिलं. अभ्यासाचे तास वाढवले, अवघड वाटणारे विषय समजून घेतले, आणि हळूहळू NEET परीक्षा जिंकण्याचा आत्मविश्वास तिने तयार केला.

प्राजक्ताच्या यशामागे तिच्या कुटुंबाची मोठी साथ आहे. वडील शरदराव शिंदे हे शिक्षणाला खूप महत्व देणारे. ते शाहू–फुले–आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे असल्याने मुलींना शिक्षण देणं, पुढे नेणं हेच त्यांनी नेहमी प्राधान्याने पाहिलं. आईने घरातील जबाबदाऱ्या सांभाळून मुलीला अभ्यासासाठी शांत, प्रेरणादायी वातावरण दिलं. चुलते अविनाश शिंदे पोलिस विभागात कार्यरत असून त्यांच्याकडूनही प्राजक्तेला सतत मार्गदर्शन मिळत राहिलं.

• शब्दांकन : लक्ष्मण साबळे •
निवासी संपादक
8605284272

SUCCESS STORIES

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

अभ्यास करताना अनेकवेळा थकवा, ताण, वेळेची कमतरता — या अडचणी तिच्या वाट्याला आल्या. पण प्राजक्ता कधीच ढासळली नाही. तिने ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मेहनत केली आणि अखेर 2025 च्या NEET परीक्षेत यश मिळवून दाखवलं.

गावातील प्रत्येक जण तिचं कौतुक करत आहे कारण सारोळे गावातून BAMS डॉक्टर होणारी ही पहिलीच मुलगी ठरणार आहे. तिच्या यशामुळे गावातील इतर मुलींमध्येही शिक्षणाबद्दलचा आत्मविश्वास वाढला आहे. "आमच्या मुलीने गावाचं नाव मोठं केलं" अशी भावना सर्वांत दिसत आहे.

आज तिच्या घरासमोर येणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर अभिमान, प्रेम आणि आनंद झळकत आहे. शिक्षक, नातेवाईक, मित्र, आणि गावकरी सर्वजण प्राजक्ताचं मनःपूर्वक अभिनंदन करत आहेत.

तिने खूप साध्या शब्दांत एक सुंदर संदेश दिला आहे "मोठी स्वप्नं बघा… आणि हार मानू नका. मेहनत केल्याशिवाय काहीच मिळत नाही."

**दैनिक आरंभपर्व तर्फे कु. प्राजक्ता शरदराव शिंदे यांना हार्दिक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा!**

## सर्वात मोठे मेटल फॉर्मिंग टेक्नॉलॉजी प्रदर्शन बेंगळुरूमध्ये

- २० देशांतील ६००+ प्रदर्शकांचा सहभाग

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मेटल फॉर्मिंग आणि उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन — IMTEX FORMING 2026 — येत्या 21 ते 25 जानेवारी 2026 दरम्यान बेंगळुरू आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र (BIEC) येथे पार पडणार आहे. इंडियन मशीन टूल मॅन्युफॅक्चरर्स




असोसिएशन (IMTMA) तर्फे आयोजित या प्रदर्शनात जगभरातील अग्रगण्य उद्योग गट एकाच व्यासपीठावर दाखल होणार आहेत.

या भव्य प्रदर्शनात 4 हॉलमध्ये 46,000 चौरस मीटर क्षेत्रफळात 20 देशांतील 600 हून अधिक प्रदर्शक अत्याधुनिक तंत्रज्ञानाची झलक सादर करतील. ऑटोमोबाईल, एरोस्पेस, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण, रेल्वे, बांधकाम उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स, भांडवली वस्तू आणि अवजड अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ प्रतिनिधी आणि उद्योगातील निर्णयकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती अपेक्षित आहे.

## भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत पक्षप्रवेशावरून मतभेद होण्याची शक्यता!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेची निवडणूक लढविण्याची रणनीती ठरविण्यासाठी आणि भाजपतर्फे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांसंदर्भात चर्चा करण्यासाठी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक (ता. ७) सकाळी होणार आहे. या बैठकीत बाहेरच्या पक्षातील कार्यकर्त्यांना प्रवेश देण्यावरून वाद होण्याची शक्यता आहे. पुणे महापालिकेची निवडणूक पुढील काही दिवसात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी तयारीसाठी कंबर कसली आहे. भाजपने महापालिका निवडणुकीची तयारी यापूर्वीच सुरु केली आहे.

पण प्रत्यक्ष उमेदवारी निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रथमच कोअर कमिटीमध्ये चर्चा होणार आहे. त्यासाठीही ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. ही बैठक एका मंगल कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

## पुणेकर दीपाली अमृतकर-तांदळे ठरल्या 'मिसेस गोल्ड हेरिटेज इंटरनॅशनल युनिव्हर्स'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

थायलंड येथे नुकत्याच झालेल्या 'मिस अँड मिसेस हेरिटेज इंटरनॅशनल-२०२५' स्पर्धेत पुण्याच्या दीपाली अमृतकर-तांदळे यांनी अभिमानास्पद कामगिरी करीत 'मिसेस गोल्ड हेरिटेज इंटरनॅशनल युनिव्हर्स' हा किताब जिंकला. समृद्ध अशा भारतीय संस्कृती व वारशाचे कलात्मक सादरीकरण त्यांनी जागतिक व्यासपीठावरून केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हा किताब जिंकून भारतात परतल्यानंतर दीपाली अमृतकर-तांदळे यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधत आपल्या यशाचा खडतर प्रवास उलगडला. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या या संवादावेळी दीपाली यांचे पती संतोष, आई सुनंदा व वडील बाळकृष्ण अमृतकर, मुलगा रेयांश उपस्थित होते. दीपाली या पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपळेगुरव येथील राहिवासी असून, आयटी क्षेत्रात नोकरी करतात. पत्नी व आई म्हणूनही त्या अतिशय उत्तम पद्धतीने आपली जबाबदारी सांभाळत आहेत.



दीपाली अमृतकर-तांदळे म्हणाल्या, "जागतिक व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करताना अभिमानाचा क्षण होता. किड्स, मिस आणि मिसेस या प्रकारांत विविध २५ देशांतील ४० स्पर्धक यामध्ये आले होते. त्यामधून माझे सर्वोत्तम योगदान देत जागतिक स्पर्धेत मिळवलेले हे यश नक्कीच आनंद देणारे आहे. जागतिक दृष्टिकोनातून शांतता, पर्यावरण, पर्यटन, संस्कृती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जागतिक वारसा यांना प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा एप्लानेट प्रायव्हेट लिमिटेड (टर्निंग इव्हेंट्स इनटू इंडिमबल मेमरीज) संस्थेच्या वतीने आयोजिली जाते.""या स्पर्धेत विविध देशांतील स्पर्धकांनी सहभागी होत आपापल्या देशातील वारसास्थळे, संस्कृतींची झलक सादर करत जागतिक ऐक्याचा संदेश दिला.

# बेकायदेशीर धर्मांतरविरोधी कायदा लागू करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात वाढत्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने "महाराष्ट्र फ्रीडम ऑफ रिलीजन (Prevention of Fraud & Coercion) Act" पारित करून लागू करावा, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशन (NSF) या सामाजिक संस्थेने केली आहे. यासंदर्भातील मागणीपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आल्याची माहिती अॅड. सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी अमेय सप्रे, प्रीतम थोरवे उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात संस्थेने नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भाग—विशेषतः धुळे, नंदुरबार, पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये—बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे धर्मांतराच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अशा प्रकारचे अवैध धर्मांतर हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे असून सामाजिक सौहार्दालाही गंभीर धोका निर्माण करणारे आहे.

संस्थेने स्पष्ट केले आहे की




धर्मांतर हे केवळ व्यक्तीच्या श्रद्धा, स्वेच्छा आणि जाणिवेवर आधारित असावे; दबाव, फसवणूक, आर्थिक लाभ किंवा इतर प्रलोभनाद्वारे केलेले धर्मांतर अवैध ठरले पाहिजे. अशा कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा आदर राखत सर्व समुदायांचे संरक्षण, धार्मिक समरसता आणि सामाजिक शांतता दृढ होऊ शकते.

तसेच परकीय निधी किंवा अनधिकृत धार्मिक बांधकामांचा गैरवापर थांबवता येईल, आणि दोषी संस्था किंवा व्यक्तींवर कठोर कारवाई करता येईल.

पत्रकार परिषदेत NSF ने या विषयावर नागरिक आणि माध्यमांनी अधिक सार्वजनिक व गंभीर चर्चा व्हावी, तसेच समाजात सर्व स्तरांवर जनजागृती वाढावी, असे आवाहन केले. तसेच राज्य सरकारने येत्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर करून तातडीने अंमलात आणावे, अशीही मागणी करण्यात आली.

नागरिक सोशल फाउंडेशनने सार्वजनिक जनजागृती, सामाजिक संशोधन, कायदेविषयक अभ्यास, तसेच कायदा अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारे डेटा, दस्तऐवज आणि समुदाय संवादाच्या प्रक्रियेत राज्य सरकारला सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

### काही प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे असाव्यात

- **धर्मपरिवर्तन हे व्यक्तीच्या वैयक्तिक श्रद्धा आणि स्वीकृतीवर आधारित असावे.**
- **दबाव, फसवणूक किंवा आर्थिक-साहित्यिक प्रलोभनाद्वारे झालेले धर्मपरिवर्तन वैध मानले जाऊ नयेत.**
- **अवैध धर्मांतर करणाऱ्या संस्थांवर, व्यक्तींवर किंवा त्यांच्या माध्यमांवर कडक शिक्षेची तरतूद असावी.**
- **स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्यांसाठी पारदर्शक, सुरक्षित आणि प्रशासकीयदृष्ट्या स्पष्ट प्रक्रिया उपलब्ध असावी.**
- **फसवणूक किंवा दबावाखाली धर्मांतर झाल्यास पीडितांना कायदेशीर मदत व न्याय मिळण्याची हमी दिली जावी.**